पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• वर्ष १ ले • अंक : १० • जुलै २००८ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती - www.punecorporation.org

## डॉ. शृंखला यांचे तणाव मुक्ती शिबीर

दिनांक १९/७/२००८ रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत कै.वडके सभागृह येथे महापालिका सेवकांसाठी तणाव व औषधमुक्त जीवनशैली या विषयावर शिबीर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबीरास नॅशनल एज्युकेशन संस्थेच्या डॉ.शृंखला व त्यांचे सहकारी श्री. परेश उपस्थित होते. शिबीराच्या सुरुवातीस डॉ.शृंखला आणि श्री. परेश यांचे पुष्पगुच्छ देवून मा.नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) यांनी स्वागत केले आणि शिबीर आयोजनाचा उद्देश स्पष्ट करताना या शिबीराच्या माध्यमातून तणाव आणि औषधमुक्त जीवन कसे जगावे हे या शिबीरात शिका. शिबीरामुळे सेवकांची कार्यक्षमता निश्चित वाढेल असा आशावाद शेवटी त्यांनी व्यक्त केला. त्यानंतर शिबीरामध्ये डॉ.शृंखला यांनी तणाव व औषधमुक्त जीवनशैली अंगिकारुन वृध्दिंगत करण्यासाठी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. सध्याच्या दैनंदिन धावपळ आणि धकाधकीच्या जीवनात कामाचा व्याप, आर्थिक, कौटुंबिक, सामाजिक, वैयक्तिक विचारसरणी आणि जडलेल्या सवयी, इत्यादी कारणांमुळे मानसिक ताण वाढत आहे. त्याचे दृश्य परिणाम शरीरावर विविध व्याधीरुपाने दिसून येतात. त्यामध्ये उच्च रक्तदाब, मधुमेह, मणकादाह, अल्पकालीन विस्मृती, तणावामुळे झोप न लागणे, भुक न लागणे, अपचन, अर्धशिशी, चिडचिडेपणा अशा शारिरीक आणि मानसिक समस्या उद्भवतात. परिणामी तुमची कार्यक्षमता कमी होते. हे स्पष्ट केले.



वरील व्याधींवर मात करण्यासाठी त्यांनी सप्तसूत्री विषद केली. १)चालणे, २)योगासने, ३) प्राणायाम, ४)ॲक्युप्रेशर, ५)चुंबकीय पध्दती, ६)वनौषधी (हर्बल) व ७) सकारात्मक विचारसरणी. याशिवाय अन्य छोटेछोटे उपचार करणे शक्य आहे. मसाज, वॉटर ड्रीप थेरपी, ध्यानध्यारणा, आवडते संगीत, आवडता सुगंध, टाळ्या वाजविणे, हसणे, रडणे याद्वारेही आपण तणावमुक्त होवू शकतो. यासाठी आपला मनोनिग्रह हवा व प्रामुख्याने आपले आरोग्य निरोगी व निरामयी होण्यासाठी आपल्या दैनंदिन जीवनशैलीमध्ये जाणीवपूर्वक सकारात्मक बदल करणे आवश्यक आहे. त्यासाठी तुमच्या दैनंदिन कार्यक्रमात एक तास हा स्वत:च्या आरोग्यासाठी अनिवार्यपणे देणे आवश्यक आहे. मला वेळ नाही, ही कुचकामी सबब कोणत्याही परिस्थितीत पुढे करण्यात येवू नये. याशिवाय स्वयंपाकघरातून बऱ्याच वस्तू वा पदार्थ आपल्या नित्यसेवनात जाणीवपूर्वक नैसर्गिक स्वरुपात आणल्यास अनेक व्याधींवर कोणत्याही साईड इफेक्टशिवाय सहजपणे मात करता येणे शक्य आहे.

वरील सप्तसूत्रींचे विश्लेषण करताना त्यांनी काही प्रात्यक्षिके करुन कार्यपध्दतीचे विश्लेषण केले. त्यामध्ये सकाळी सूर्योदयापूर्वी वा नंतर एक तास या दोन तासांपैकी कोणतीही ४० मिनिटे तुम्ही चालले पाहिजे. त्यामध्ये सुरुवातीची १० मिनिटे प्रोत्साहित करण्यासाठी हळूहळू चालावे. पुढील १० मिनिटे वेगात चालावे. त्यापुढील १० मिनिटे हातांच्या हालचाली वेगाने करत चालावे आणि शेवटची १० मिनिटे वेगावर नियंत्रण ठेवून संथ गतीने चालावे. योगासने १०-१५ मिनिटे करावीत. यामुळे शरीरातील अंतर्गत अवयवांना व्यायाम दिला जातो. प्राणायाम १०-१५ मिनिटे करावे. ज्यामुळे तुमची श्वसन यंत्रणा निरोगी राहून रक्ताभिसरण उत्तम होते आणि तुम्ही ताजेतवाने होता. ॲक्युप्रेशरमध्ये शरिराचा एखादा अवयव दुखत असेल तर त्याचा मूळ बिंदू निश्चित करुन त्या ठिकाणी योग्य पध्दतीने दाब दिल्यास दुखऱ्या भागाच्या वेदना निश्चित कमी होतात. त्यासाठी मूळ बिंदूचा शोध घेवून योग्य प्रकारे दाब देण्याबाबत मार्गदर्शन केले. आपण आयुष्यातील प्रत्येक दिवशी निसर्गनियमानुसार किमान ७-८ तास झोप घेणे अत्यंत गरजेचे आहे. झोपेमुळे दैनंदिन कामामुळे झालेली शरीराची झीज भरुन निघते आणि विश्रांतीमुळे सर्व अवयव पुन्हा दुसऱ्या दिवशी कामासाठी ताजेतवाने होतात. हे करत असताना चुंबकीय शय्येचा उपयोग केल्यास त्याचे अत्यंत चांगले परिणाम दिसून येतात. चुंबकीय शय्या आपण घरीही स्वत: बनवू शकतो. याचेही मार्गदर्शन त्यांनी या प्रशिक्षण वर्गामध्ये केले. औषधी वनस्पती (हर्बल) बाबत मार्गदर्शन करताना लसूण १-२ पाकळ्या सकाळी खाव्यात, दूध व दुग्धजन्य पदार्थ, तुलसी पान, आले, कढीपत्ता, कडधान्ये, चिंच, गुळ यासारखे पदार्थ सेवनात असावेत. आठवड्यातून एक दिवस अळूच्या भाजीचा आहारात समावेश असावा. सर्वात महत्वाचे म्हणजे जगण्यासाठी खा, खाण्यासाठी जगू नका असे डॉ. शृंखला यांनी प्रशिक्षणार्थींना सांगितले.

सर्वात शेवटी सकारात्मक विचारसरणी ही माणसाच्या निम्या व्याधी दूर करते. जी व्यक्ती प्रत्येक गोष्टीकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पहाते तिला सर्व जग आणि प्रत्येक गोष्ट सुंदर दिसते. त्यामुळे त्याच्या विचारसरणीला वेगळी पूरक शक्ती मिळून धार येते. त्याचे परिणाम व्यक्तीच्या मानसिक विचारावर होवून शरिरातील अवयव त्याप्रमाणे त्या व्यक्तीच्या कार्याला प्रतिसाद देतात आणि अंतिमत: ती व्यक्ती आपली कार्यक्षमता वाढवून आपले ध्येय साध्य करु शकते. या गोष्टीचा सर्वांनी लाभ घ्यावा आणि आपले आयुष्य निरोगी निरामयी आणि आनंदी वृत्तीने जगावे या सर्वांसाठी जिभेवर म्हणजे खाणे आणि बोलणे यावर नियंत्रण ठेवावे आणि वरील सप्तसूत्रीचा अवलंब करणेकामी आयुष्यातील प्रत्येक दिवशी एक तास आपल्या आरोग्यासाठी द्यावा, हा मूलमंत्र त्यांनी दिला. त्यानंतर डॉ. शृंखला यांचे आभार व्यक्त करुन शिबीराची समाप्ती झाली.

## प्रा. कोकाटे यांचे प्रशिक्षण



महापालिका अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी एक तासात इंग्लिश बोलणे शिकविणे प्रशिक्षण कार्यक्रम प्रा.महादेव कोकाटे यांचेमार्फत दिनांक ९/७/२००८ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे दोन सत्रांमध्ये (सकाळी ११ ते २ व दुपारी ३ ते सायंकाळी ५) आयोजित करण्यात आला होता. प्रशिक्षण कार्यक्रमाचे पहिले सत्र चतुर्थ श्रेणीतील सेवकांसाठी आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षण वर्गास क्षेत्रीय कार्यालयाकडील सेवकांसह सुमारे ७० कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रा. महादेव कोकाटे यांचे स्वागत पुष्पगुच्छ देवून सल्लागार (कामगार) मा. नंदकिशोर जगताप यांनी केले. या प्रशिक्षण वर्गामध्ये प्रा.महादेव कोकाटे यांनी विनामूल्य प्रशिक्षण देणार असून त्यांचा सर्वांनी लाभ घ्यावा, शाळा व महाविद्यालयांमध्ये शिकत असलेल्या मुलांबरोबर संवाद साधणे सुकर व्हावे, दैनंदिन कामकाजामध्ये आणि व्यवहारामध्ये काही प्रमाणात इंग्रजीचा वापर होत असल्याने त्याबाबत असे प्रशिक्षण कार्यक्रम उपयुक्त असल्याने मा. महापालिका आयुक्त यांचे पुढाकाराने सदर प्रशिक्षणाचे आयोजन केले असल्याचे मा. जगताप यांनी आपल्या प्रास्ताविकात नमूद केले.

या प्रशिक्षणामध्ये प्रा. महादेव कोकाटे यांनी दैनंदिन कामकाज व व्यवहारामध्ये वापरण्यात येणारी छोटी छोटी साधी वाक्ये इंग्रजीमध्ये कशी बोलावीत? याबाबत अत्यंत सुलभ व सोप्या पध्दतीने प्रशिक्षण दिले. शिवाय क्रियापदांचा सुलभ वापर, क्रियापदांची विविध रुपे, वाक्यांचे प्रकार, व्याकरण, इत्यादींबाबत सुलभ पध्दतीने व परिणामकारकपणे मार्गदर्शन करुन प्रशिक्षणार्थींकडून वाक्ये तयार करुन घेतली.

सदर प्रशिक्षणाचे दुसरे सत्र दुपारी ३ ते ५ या कालावधीत संपन्न झाले. या सत्रासाठी महापालिकेतील तृतीय श्रेणीतील सुमारे १५० कर्मचारी उपस्थित होते. तसेच, वर्ग १ व वर्ग २ मधील अधिकारी यांनी आवर्जून उपस्थिती लावली. या प्रशिक्षणाच्या अनुषंगाने उपस्थित प्रशिक्षणार्थींनी अभिप्राय नमूद केले असून, त्यामध्ये १.प्रशिक्षण उपयुक्त आहे. २. इंग्लिश बोलण्याची भीती गेली. ३ . प्रशिक्षणाचा कालावधी कमी होता तो वाढविणे आवश्यक आहे. ४. असे प्रशिक्षण कार्यक्रम वारंवार राबवावेत. ५. यापासून प्रोत्साहन मिळाले.

प्रा. कोकाटे यांचेमार्फत आयोजित करण्यात आलेल्या या प्रशिक्षण वर्गाची पुणे मिरर या वर्तमानपत्राने दखल घेवून या वर्गाच्या उपयुक्ततेचे वार्तांकन केलेले आहे. प्रशिक्षणाची उपयुक्तता आणि उपस्थित प्रशिक्षणार्थींनी नमूद केलेले अभिप्राय आणि इतर कर्मचाऱ्यांकडून होत असलेली विचारणा लक्षात घेवून प्रा. कोकाटे यांचे पुढील प्रशिक्षण ऑगस्ट महिन्यात आयोजित करण्याचा सल्लागार (कामगार) कार्यालयाचा मनोदय आहे. सदरचे शिबीर यशस्वी होण्यासाठी सल्लागार (कामगार) कार्यालयाकडील सहकाऱ्यांनी अविरत परिश्रम घेतले.

## प्रशासन

लोकशाहीचे शासन, प्रशासन, न्यायालय हे तीन आधारस्तंभ आहेत. प्रसारमाध्यमे हा चौथा आधारस्तंभ मान्यता पावत आहेत. शासनाने लोक भावनांचा आदर करुन विकास कार्यासाठी दिशादर्शक धोरणे आणि कायदे मान्य करावयाचे असतात. शासनमान्य धोरणांची व कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी प्रशासनामार्फत करण्यात येते. अंमलबजावणी करताना किंवा मान्य धोरणातील वा पारित अधिनियमातील तरतुदींचा अन्वयार्थ लावताना विसंगती झाल्यास त्या विसंगतीबाबत तज्ञ त्रयस्त म्हणून न्यायालये आपले निर्णय देत असतात. या सर्व यंत्रणेमध्ये कर्तव्ये पार पाडण्याची अत्यंत महत्वपूर्ण भूमिका प्रशासनाची असते. त्या अनुषंगाने प्रशासनावर जबाबदाऱ्याही येतात. ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार पंचायत राज्य या संकल्पनेद्वारे शासनाने, शासन नागरिकांच्या दारी, अशी भूमिका स्विकृत केली. परिणामी प्रशासनाची जबाबदारी प्रचंड वाढली. त्यामुळे शासकीय आणि निमशासकीय कार्यालये लोकाभिमुख कर्तव्ये पार पाडणारी प्रभावी केंद्रे ठरत आहेत. कालानुरुप नागरिकांच्या गरजात बदल व वाढ होत आहे. त्याचबरोबर संपर्क माध्यमे प्रभावी ठरत आहेत. माहिती अधिकारासारखे कायदे शासनाने मान्य करुन अतिरिक्त जबाबदारी प्रशासनावर टाकली आहे. या सर्व बदलांमुळे प्रशासनासही बदलणे अपरिहार्य झाले आहे. त्यामुळे प्रशासन प्रत्येक अंमलबजावणीच्या विहित वेळेस जबाबदार आहे. त्याचे प्रचंड दायित्व प्रशासकीय यंत्रणेवर येत आहे. वाढलेली हद्द, लोकसंख्या, वाहन संख्या आणि उपलब्ध साधनसामग्री यांचे व्यस्त प्रमाण विचारात घेता, नागरिकांना नागरी सुविधा देणेकामी प्रस्थापित यंत्रणेवर येणारा प्रचंड ताण कमी करण्यासाठी, यांत्रिकीकरण, खाजगीकरण, लोकसहभाग या मार्गांचा अवलंब करणेत येत आहे. कारण उपलब्ध उत्पन्नाचे मार्ग, मनुष्यबळ, साधनसामग्री, त्यावर होणारा महसुली आणि भांडवली खर्च यांचा समन्वय साधून नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करताना होणारी त्रेधातिरपीट याचे भान ठेवून प्रशासन मार्ग आक्रमत आहे. त्यासाठी शहराचे चार विभाग करुन, १४ क्षेत्रीय कार्यालये स्थापन केली आहेत. क्षेत्रीय कार्यालये स्वयंपूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न चालू आहेत. त्याचा एक मुख्य भाग, कामाचे आणि अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. जेणेकरुन **शासन तुमच्या दारी** ही संकल्पना राबविणेकामी नागरिकांना आपल्या घराजवळील क्षेत्रीय कार्यालयात दैनंदिन अडचणी सोडविणेकामी प्रभावी यंत्रणा उपलब्ध केली आहे. मा. महापालिका आयुक्त, श्री. प्रविणसिंह परदेशी यांनी अत्यंत ऐतिहासिक आणि धाडसी निर्णय घेवून, या विकेंद्रीकरणाचे आदेश प्रसृत करुन, त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणीही केली आहे. मा. स्थायी समितीनेही २५ लाखांच्या निविदा मान्य करण्याचे अधिकार प्रभाग समितीस सुपूर्त करुन उत्तम पायंडा पाडला आहे. त्याची दखल घेणे आवश्यक आहे. माहिती तंत्रज्ञानामधील उत्क्रांती, साक्षरता, प्रचार आणि प्रसार, समाजाच्या निम्न स्तरातील जागृती, सामाजिक स्तर उंचाविणे, बदलती जीवनशैली तसेच माहिती तंत्रज्ञान व उच्च दर्जाच्या शिक्षणासाठी जागतिक स्तरावर पुणे शहर मान्यता पावले आहे. त्यामुळे नवीन नागरी समस्यांना या शहरास सामोरे जावे लागत आहे. परिणामी प्रशासनाची जबाबदारी वाढत आहे. शहरवासियांना उच्च दर्जाच्या नागरी सुविधा देणेकामी प्रशासन गतिमान राखणे, अपरिहार्य आहे. प्रशासनातील कामाची ढोबळ मानाने दोन भागात विभागणी होते. कार्यालयीन काम व प्रत्यक्ष कार्यक्षेत्रातील काम. कार्यक्षेत्रातील काम महत्वाचे व कार्यालयीन काम दुय्यम हा दृष्टिकोन अत्यंत चुकीचा आहे. कार्यालयीन काम आणि क्षेत्रीय स्तरावरील काम हे एकमेकांना पूरक आहे. कारण कार्यालयीन कामाद्वारे क्षेत्रीय स्तरावरील कामाचे अचूक आणि कालमर्यादा निश्चित करुन नियोजन केले जाते. म्हणजेच क्षेत्रीय स्तरावरील कामकाजाची पायाभूत चौकट कार्यालयीन कामाद्वारे उपलब्ध करुन दिली जाते. हे जगन्मान्य सत्य आहे. त्यामुळे कार्यालयीन व क्षेत्रीय स्तरावर समन्वय व सौहार्द्य असणे नितांत गरजेचे आहे.

प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर परिणाम करणारे अनेक घटक आहेत. त्यामध्ये कार्यालयाचे स्थान व बैठक, उपलब्ध साधन सामग्री, कार्यपध्दती, संपर्क माध्यमे आणि सामूहिक जबाबदारीचे यथार्थ भान, प्रभावी नियंत्रण व पर्यवेक्षण या सर्व घटकांचे उत्तम रसायन तयार झाल्यास निश्चित वेळेत कार्य यशस्वी होते. सर्व सेवकांनी ही संस्था आपली आहे. या संस्थेची शहरातील नागरिकांना मुलभूत नागरी सुविधा पुरविणे ही जबाबदारी आहे. ती प्रामाणिक पणे आणि उत्तमतऱ्हेने पार पाडणे आपली जबाबदारी आहे. यासाठी संस्था नागरिकांकडून वसुल करणाऱ्या कराच्या रकमेतून आपल्याला वेतन प्रदान करीत आहे. त्याचे भान ठेवणे आवश्यक आहे. आपल्या तत्पर सेवेने संस्थेची, प्रशासनाची प्रतिमा उंचावणार आहे. प्रशासकीय यंत्रणेतील अधिकारी/सेवक निश्चितपणे आपली जबाबदारी पार पाडत आहेत. परिणामी महानगरपालिका प्रशासन समर्थपणे उत्तम नागरी सुविधा देत आहे व देणार आहे.

# परिचय अभिनव अधिकारी सेवकाचा

श्री.जयंत दत्तात्रय पवार, व्यवस्थापक, पुणे मनपा मुद्रणालय हे कालानुरुप छपाईचे आधुनिक तंत्रज्ञान संगणक प्रणालीमार्फत मुद्रणालयात राबवित असताना श्री.पवार यांच्या कादकिर्दीतील कार्यपध्दती व वैशिष्ट्यपूर्ण योजना यांचा घेतलेला वेध -

श्री. पवार यांनी मनपा मुद्रणालयाकडे रोजंदारी मदतनीस म्हणून सेवा सुरु केली. तीन वर्षे रोजंदारीत काम केल्यानंतर ते कार्यालय मदतनीस म्हणून कायम झाले. सेवेत असताना त्यांनी बी.कॉम ही पदवी धारण केली. तसेच मनपा प्रशासनाच्या दृष्टीने आवश्यक असलेला एलएसजीडी व कॉम्प्युटरमधील डीआयटी हा कोर्स त्यांनी यशस्वीरित्या पूर्ण केला. दरम्यानच्या काळात त्यांना व्यवस्थापकांच्या रजा मुदतीत निवडणूक कामाची अतिरिक्त जबाबदारी देण्यात आली. त्यांना मिळालेल्या या संधीचे त्यांनी सोने करुन १९९७ च्या निवडणुकांमध्ये बिनचूक व विहित मुदतीत मतपत्रिका व अनुषंगिक छपाईचे काम पूर्ण केले. त्या वेळी महाराष्ट्रात पुणे मनपा ही निवडणुकीच्या मतपत्रिका छपाई कामात एकही चुक नसलेली महापालिका घोषित झाली. याच काळात त्यांचेवर व्यवस्थापक पदाची संपूर्ण जबाबदारी आली. त्या वेळी मुद्रणालयात खिळ्यांची अक्षरे जुळवून (लेटरप्रेस पध्दती) छपाई होत असे. श्री. पवार यांची मुद्रणालय व्यवस्थापक या पदावर नियमित नेमणूक झाल्यानंतर तत्कालीन उप आयुक्त मा. एन.डी.सावंत यांचे मार्गदर्शनाखाली त्यांनी आधुनिक ऑफसेट पध्दती विकसित केली. ऑफसेट पध्दतीमुळे २८ टन टाईप खिळे भंगारमध्ये काढण्यात आले. परिणामी कमी जागेत कमी मनुष्यबळात पण अत्यंत आकर्षक व अत्याधुनिक पध्दतीची सुबक छपाई उपलब्ध होवू लागली आहे. या बाबीचे महत्व विषद करताना ते सांगतात की,



महाराष्ट्र शासनाकडे मुद्रणालयासंबंधीची तेरा प्रकारची कामे तेरा वेगवेगळ्या ठिकाणी चालतात. तथापि, पुणे महापालिकेत तेरा प्रकारची कामे एकाच छताखाली होतात. तसेच पुणे महापालिकेच्या कामाबरोबरच मा.प्रविणसिंह परदेशी यांचे सूचनेवरुन पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पीएमटी, पीएमपीएमएल, पीसीएमटी या संस्थांची देखील कामे मुद्रणालयात केली जातात.

**शब्दांकन : अरुण खिलारी, कामगार कल्याण अधिकारी**

महाराष्ट्र शासनाकडील जिल्हा परिषदेच्या निवडणुकांमध्ये मतपत्रिका छपाईत फोटो झिंको प्रेसला अडचण निर्माण झाल्यामुळे ते पूर्ण करु न शकलेले काम तत्कालीन आयुक्त, मा. रमानाथ झा यांचे आदेशावरुन विहित मुदतीत पूर्ण केले. कामकाजाचा दर्जा सुधारल्याने व जनगणनेचे काम पूर्ण करणे आवश्यक असल्याने मा. अरुण पाटील, सह आयुक्त यांनी त्यांचेवर सोपविलेली सेन्सेटिव्ह एरियाचे जनगणनेचे काम त्यांचेवर सोपविण्यात आले. त्यात देखील त्यांनी उत्कृष्ट काम केल्याबद्दल मा. राष्ट्रपतींचे रौप्य पदक मिळविले. या अशा कामाबरोबरच त्यांनी मनपाची विविध प्रकारची छपाई कामे विहित मुदतीत व बिनचूक पूर्ण करुन अनेक पुरस्कार मिळविलेले आहेत. यामध्ये तत्कालीन महापौर मा. वत्सला आंदेकर व मा. दिप्ती चौधरी यांचेकडून यथोचित सत्कार करण्यात आले आहेत. डिझेल कॉलनीमधील मुलांसाठी पुस्तक वाटप, सायंकालीन अभ्यासवर्ग, इत्यादी कार्याप्रित्यर्थ त्यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव पदकाने सन्मान करण्यात आला. त्यांनी प्रौढ साक्षरता अभियानातही सक्रिय सहभाग घेतलेला आहे. नव्याने साक्षर झालेल्या प्रौढांची हस्तलिखिते असलेले मा.अशोक कळमकर यांचेकडील अक्षरफुले हे पुस्तक तत्कालीन मा.राष्ट्रपती यांना सादर केले असता ते अत्यंत प्रभावीत होवून श्री.पवार यांच्या छपाई कौशल्याची दखल घेत कौतुक केले व त्यांना महात्मा फुले साक्षरता अभियान पुरस्कार प्रदान केला. याव्यतिरिक्त श्री.पवार यांना १९९७, २००२, २००७ साली निवडणुकीच्या छपाईचे काम उत्कृष्ट केल्याबद्दल तत्कालीन महापालिका आयुक्त मा.राजीव अग्रवाल, मा.अजित वर्टी, मा.टी.सी.बेंजामिन यांनी अर्धशासकीय पत्र देवून गौरव केला.

मनपा मुद्रणालयाकडे एकाच वेळी ५२ ठिकाणी क्रमांक देणारी अद्ययावत मशिन आहे. ही पहाण्याकरिता जर्मनीतील नंबरींग मशिन बनविणारी एक अग्रेसर कंपनी लिबिंजर चे संचालक मॅनफर्ड लोचेर यांनी मनपा मुद्रणालयास भेट दिली. या मशिनचे कामकाज पाहून ते प्रभावित झाले व क्षेत्रीय आयुक्त मा. सुरेश जगताप आणि श्री. पवार यांना त्यांनी पेन भेट दिले.

मनपाकडील प्रेस, व्हेईकल डेपो, वॉटरवर्क्स व वर्कशॉप या विभागांना फॅक्टरी ॲक्ट लागू आहे. त्यामुळे त्यांना राज्य कामगार विमा योजना, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजना या लागू होत्या. मा.नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) यांच्या मार्गदर्शनानुसार वरील योजनातून सुट मिळविणेकामी श्री.पवार यांनी माहिती व कागदपत्रे उपलब्ध करुन देवून महत्वाची भूमिका बजावली. परिणामी मनपा सेवकांना लागू असणाऱ्या योजना मुद्रणालयाकडील सेवकांनाही लागू झाल्या व त्यांना उत्तम लाभ मिळू लागले. त्याशिवाय श्री. पवार व्यवस्थापक पदावर रुजू झाले त्यावेळी कामगार व कामगार संघटनांनी विविध न्यायालयात सुमारे १० ते १२ दावे दाखल केलेले होते. त्यांच्या कारकिर्दीत बहुसंख्य दावे निकाली झाले असून आजमितीस एकच दावा प्रलंबित आहे, हे ते अभिमानाने सांगतात. याबाबत त्यांनी कामगार व कामगार संघटनांबरोबर समन्वय राखून जबाबदाऱ्या वेळोवेळी पार पाडल्याचे दिसते. दैनंदिन कामात मनपा मुद्रणालयाकडील सर्व सेवकांचे विशेषत: सहा. व्यवस्थापक श्री. प्रकाश सुरकुले व श्री.जी.बी.मनुकर तसेच सर्वश्री विजय कुलकर्णी, माणिक लोखंडे, नारायण मुकनाथ, सुभाष गोसावी, तुकाराम बनसोडे, बेल्हेकर, अनंता भोसले यांच्या सहकार्याचा ते आवर्जून उल्लेख करतात.

सध्या अत्याधुनिक डिजिटल तंत्रानुसार नंबरींग, फॉर्म, स्टेशनरी प्रिंटींगची सुविधा खातेप्रमुख मा. भानुदास माने यांच्या मार्गदर्शनाखाली मुद्रणालयामध्ये उपलब्ध करुन देण्याचा त्यांचा मनोदय आहे. श्री. पवार धार्मिक प्रवृत्तीचे असून, विविध धार्मिक कार्यात हिरीरीने भाग घेतात. सध्या ते श्री गजानन महाराज शेगाव, परिवार केंद्र, पुणे या न्यासाचे ते विश्वस्त म्हणून काम करीत आहेत. या कामाबरोबरच सामाजिक जीवनात देखील मागास विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह व अनुषंगिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले.

हा त्यांच्या कारकिर्दीतील विशेषत: रोजंदारीतील मदतनीस ते व्यवस्थापक, मुद्रणालय त्यातील व्यवस्थापक पदावरील १२ वर्ष म्हणजे एका तपपूर्तीची कारकिर्द त्यांनी यशस्वीरित्या पूर्ण केली आहे. त्यांचा हा प्रवास व उत्कृष्ट कार्याचा सतत उंचावत जाणारा आलेख इतर सर्व सहकार्यांना आदर्श घालून देणारा व निश्चितच प्रेरक आहे.

## कामगार प्रशिक्षण वर्ग क्र. ७१-७२ चे शानदार उद्घाटन

सन २००७-०८ सालामध्ये अनुक्रमे वर्ग ३ व ४ मधील सेवकांसाठी कामगार प्रशिक्षण वर्ग क्र. ७१ व ७२ चा उद्घाटन समारंभ दिनांक १/७/२००८ रोजी जुने कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालय इमारत, कसबा पेठ येथे पार पडला. सदर प्रशिक्षण वर्गास प्रत्येकी ४० सेवकांना प्रवेश देण्यात आला आहे. वर्ग क्र. ७१ साठी श्री. श्रीकृष्ण घरडे व वर्ग क्र. ७२ साठी श्री. विजय कांबळे यांची कामगार शिक्षक म्हणून तर समन्वयक म्हणून कामगार कल्याण अधिकारी श्री. अरुण खिलारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



कार्यक्रमास भारतीय राज्य घटना व सामाज शास्त्रांचे गाढे अभ्यासक, २२ पुस्तकांचे लेखक व मान्यवर विचारवंत प्रा. हरी नरके, प्रमुख महात्मा फुले अध्यासन, पुणे विद्यापीठ उद्घाटक म्हणून लाभले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मा. नरके यांच्या हस्ते आद्य कामगार नेते कै. नारायण मेघाजी लोखंडे यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. कामगार प्रशिक्षण वर्गाच्या कोणत्याही कार्यक्रमाची सुरुवात कै.लोखंडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुनच होते. या प्रथेबद्दल श्री. नरके भारावून गेले व या प्रथेचे त्यांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली. आपल्या उद्घाटनपर भाषणात त्यांनी सांगितले की, कै. लोखंडे यांचे कामगार चळवळीतील योगदानाबद्दल सध्याचे कामगार अनभिज्ञ आहेत. आज आपणास मिळणाऱ्या साप्ताहिक सुट्या, कामाचे तास, मधली विश्रांती याचा पाया महात्मा ज्योतीराव फुले यांचे शिष्य कै. लोखंडे यांच्या चळवळीने रचला. त्यानंतर त्यांनी भारतीय राज्य घटना व आरक्षण याबाबतचे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व सध्या नागरिकांतील संभ्रम याबाबत विस्ताराने विवेचन केले.

मा. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात प्रशिक्षणार्थींना कामगार प्रशिक्षण योजनेबाबतची माहिती दिली. तसेच, त्यांनी वैयक्तिक जीवनातील शिस्तीचे महत्व सोदाहरण स्पष्ट केले. बदलत्या काळानुसार स्वत:मध्ये बदल करणे आवश्यक असून, असा बदल केला नाही तर कालौघात आपले अस्तित्वच संपुष्टात येईल, असे ते म्हणाले.

प्रशिक्षणार्थींना पुणे म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष श्री. तुकाराम जगताप यांनी मार्गदर्शन केले. श्री. जगताप यांनी बऱ्याच वर्गांवर कामगार शिक्षक म्हणून काम केले आहे. तसेच, सहलींचे यशस्वीरित्या नियोजन केले आहे. या नियोजनाबाबतचे अनुभव त्यांनी विषद केले. केंद्रीय कामगार शिक्षण मंडळ, पुणे येथे कार्यरत असलेले शिक्षणाधिकारी श्री. प्रशांत एडवी यांनीही मार्गदर्शन केले व वर्गास शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. विजय कांबळे यांनी केले व आभारप्रदर्शन श्री. अरुण खिलारी यांनी केले.

## माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे अंमलबजावणीसाठी

- अधिनियमातील कलम ४ नुसार १७ बाबींची माहिती विहित नमुन्यात संकेतस्थळावर प्रसृत करा.
- प्रसृत केलेली माहिती वेळोवेळी अद्ययावत करा.
- जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे आलेल्या माहिती मागणी अर्जांवर ३० दिवसांत कार्यवाही करणे बंधनकारक आहे.
- माहिती मागणी अर्ज आपल्या विभागाशी संबंधित नसल्यास संबंधित विभागाकडे ५ दिवसांत पाठवून त्याप्रमाणे अर्जदारास कळवा.
- प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने त्यांच्याकडे दाखल झालेल्या अपिलांबाबत ४५ दिवसांत अंतिम कार्यवाही करणे बंधनकारक आहे.
- अधिनियमातील तरतुदीनुसार मासिक अहवाल मे. राज्य शासनाकडे सादर करणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने विवरणपत्र क्र. १, २ व ३ भरुन सल्लागार (कामगार) कार्यालयाकडे दरमहा ५ तारखेपर्यंत पाठवावे.
- वार्षिक अहवाल प्रत्येक वर्षी जानेवारी महिन्यामध्ये सादर करणे बंधनकारक आहे.
- वार्षिक अहवाल विवरणपत्र क्र. १, २ व ३ मध्ये दिनांक ५ जानेवारी पूर्वी सल्लागार (कामगार) कार्यालयाकडे सादर करावा.
- मा. आयुक्त, राज्य माहिती आयोग यांचेकडील मासिक विशेष अपिल निर्गत कार्यक्रमास आपल्याकडील अपिलीय कागदपत्रे आणि माहितीसह जन माहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकाऱ्यांनी वेळेवर उपस्थित राहावे.
- या कामी मा. महापालिका आयुक्त वा मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करा.
- माहिती अधिकार अधिनियमातील सर्व तरतुदींचे कटाक्षाने पालन करा आणि शास्तीपासून दूर राहा.

## संघटनेतर्फे गुणवंतांचा सत्कार



अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेतर्फे या वर्षी घेण्यात आलेल्या एलएसजीडी, एलजीएस, फायनान्स मॅनेजमेंट, इत्यादी परीक्षांमध्ये विशेष नैपुण्य प्राप्त केलेल्या सेवकांचा सत्कार पीएमसी एम्प्लॉईज युनियन, पुणे यांचे वतीने दिनांक ९/७/२००८ रोजी श्रमिक हॉल येथे आयोजित करण्यात आला होता. या हृद्य सत्कार समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून मा. डी.एस.देशपांडे, अध्यक्ष, पुणे मनपा कामगार युनियन व श्री. शिवाजी दौंडकर, कामगार कल्याणाधिकारी उपस्थित होते.

या प्रसंगी एलएसजीडी परीक्षेत प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवून उत्तीर्ण झालेल्या अनुक्रमे श्री.राजेंद्र मोरे व श्रीमती भाग्यश्री जोशी यांचा गौरव करण्यात आला. तसेच, एलजीएस परीक्षेमध्ये प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त केलेल्या अनुक्रमे श्री. रमेश मारणे व ॲड. मंजुषा इधाटे यांचा व फायनान्शियल मॅनेजमेंट परीक्षेत प्रथम व द्वितीय क्रमांकाचे यश प्राप्त केलेले श्री. चंद्रकांत शितोळे व श्रीमती सुजाता यंदे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे सेवेत असताना एल.एल.बी. ही पदवी प्राप्त केल्याबद्दल श्री. सचिंद्र जाधव यांचाही सत्कार या वेळी करण्यात आला. या समारंभात सन २००८ मध्ये महापालिकेतर्फे गुणवंत पुरस्कार प्राप्त केलेल्या सर्वश्री चंद्रकांत शितोळे, अविनाश पंढरी, अनिल वेल्हाळ, मदन वाव्हळ व दगडु ढोकळे यांचाही सन्मान करण्यात आला. याशिवाय मनपा बँकेवर निवडून आलेल्या नवनिर्वाचित संचालकांचा बहुमान करण्यात आला.

पीएमसी एम्प्लॉईज युनियनचे सरचिटणीस व उपमुख्यलेखापरीक्षक श्री. पांडुरंग सावंत हे प्रदीर्घ सेवेनंतर महापालिकेच्या सेवेतून सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा विशेष सत्कार या प्रसंगी करण्यात आला. या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना मा. डी.एस.देशपांडे यांनी जागतिकीकरण आणि वैश्विकरणामुळे कर्मचाऱ्यांपुढे मोठे संकट ठाकले असून, त्यांचे प्रश्न सोडविणेकामी संघटनांनी पुढाकार घेवून सकारात्मक कार्य करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. खाजगीकरण आणि वैश्विकरणाच्या युगामध्ये कर्मचाऱ्यांनी आपल्या कार्यक्षमता वाढीस लावून पूर्ण क्षमतेने काम करण्याची गरज आहे आणि यामध्ये कर्मचारी यशस्वी झाले नाहीत तर खाजगीकरण अटळ असल्याचे श्री. दौंडकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले. या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन पीएमसी एम्प्लॉईज युनियनने केले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघटनेचे अध्यक्ष श्री. तुकाराम जगताप यांनी केले. या वेळी पीएमसी एम्प्लॉईज युनियनचे पदाधिकारी, कार्यकर्ते व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सत्कार समारंभ

इयत्ता १० वी व १२ वीच्या परीक्षेमध्ये विशेष प्राविण्य प्राप्त केलेल्या सभासद सेवकांच्या पाल्यांचा गुणगौरव समारंभ दिनांक ३०/७/२००८ रोजी दुपारी ३ वाजता श्री. छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, पुणे मनपा येथे आयोजित करण्यात आला आहे. तरी, सर्व सभासद सेवकांनी आणि १० वी १२ वीत ७५% पेक्षा जास्त गुण प्राप्त केलेल्या व अर्ज केलेल्या सर्व सभासद सेवकांनी आपल्या पाल्यासह या समारंभास उपस्थित रहावे. या गुणगौरव समारंभामध्ये नामवंत वक्त्यांचे १० वी - १२ वी नंतरच्या वाटा या विषयावर मार्गदर्शन लाभणार आहे, याची नोंद घ्यावी.

## शेवटच्या सहामाहीत सेवानिवृत्ती वेतनासाठी घ्यावयाची काळजी

सेवानिवृत्त होणाऱ्या **महापालिका सेवकाने** सेवाकालातील शेवटच्या सहा महिन्यांमध्ये खालीलप्रमाणे काळजी घ्यावी.

१. सेवापुस्तकातील सर्व नोंदी परिपूर्ण व अद्ययावत करुन घ्याव्यात.
२. सेवापुस्तकातील सर्व नोंदींवर खातेप्रमुखांच्या स्वाक्षऱ्या असल्याची खातरजमा करावी.
३. सेवापुस्तकानुसार शिल्लक रजा किती आहे याची खातरजमा करुन त्यानुसार रजा उपभोगाव्यात.
४. पुणे म्युनिसिपल सर्व्हंटस कोऑपरेटीव्ह बँक, गणेश सहकारी बँक, पुणे मनपा सेवक ग्राहक भांडार यांचे ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे.
५. महापालिकेच्या सदनिकांमध्ये रहात असल्यास थकबाकी बाबतचा दाखला उपलब्ध करुन घ्यावा.
६. वाहन कर्ज, घर बांधणी कर्ज, संगणक खरेदी कर्ज, इत्यादींचे हिशेब पूर्ण करुन तसे संबंधित खात्याचे दाखले घ्यावेत व त्याची नोंद सेवापुस्तकात करुन दाखल्याची एक प्रत सेवापुस्तकामध्ये डकवावी.
७. सेवकाने त्याच्या ताब्यात असलेली प्रकरणे, वस्तु वा तदनुषंगिक साधनसामग्रीची तपशिलवार ताबा यादी करावी.
८. बँकेत जामिनदार असल्यास त्याचा बोजा कमी करावा.
९. निवृत्तीपूर्व चार महिने भविष्य निर्वाह निधीची वर्गणी बंद करुन अंतिम बिल करणेसाठी संबंधित खात्यामध्ये अर्ज करावा.
१०. सेवेमध्ये पेन्शनसाठी भर घालणेकामी स्थायी समितीच्या मान्यतेसाठीचा अर्ज करावा. (सेवा ३३ वर्षांपेक्षा कमी असेल तरच)
११. सेवानिवृत्तीनंतर वैद्यकीय सहाय्य योजनेचा लाभ मिळणेकामी विहित फॉर्ममध्ये सेवानिवृत्तीनंतर लगेचच अर्ज करुन सदस्यत्व घ्यावे.
१२. पेन्शन विक्रीचा अर्ज सेवानिवृत्तीनंतर लगेचच खातेप्रमुखांकडे स्वत: सादर करावा व पोहोच सांभाळून ठेवावी.

**पगारपत्रक लेखनिकांनी घ्यावयाची काळजी**

१. सेवक सेवानिवृत्त होण्यापूर्वी एक वर्ष अगोदर पेन्शन प्रकरण सुरु करावे.
२. पेन्शन प्रकरणी पेन्शन विभागाकडील प्राथमिक तपासणी व मुख्य लेखापरीक्षक कार्यालयाकडील अंतिम तपासणीकामी आक्षेपांची हातोहात पूर्तता करुन प्रकरण निकाली काढावे.
३. सन १९७६, १९८६ व १९९६ या वेतन आयोगामुळे सुधारित वेतनश्रेण्यांच्या नोंदी, वेतन निश्चितीकरण अगोदरच तपासून बरोबर असल्याची खात्री करुन घ्या.
४. जोपर्यंत संबंधित प्रकरणी पी.पी.ओ.नंबर प्राप्त होत नाही तोपर्यंत सदर प्रकरण विभागाकडे प्रलंबित आहे हे लक्षात घेवून दक्षतापूर्वक कार्यवाही करावी.
५. सेवानिवृत्त सेवकांनी नियत दिनांकास निवृत्तीवेतन व देय रकमा देणे बंधनकारक आहे. या अनुषंगाने शासनाने निर्गमित केलेल्या आदेशानुसार विलंबाने देण्यात येणाऱ्या रकमांवर व्याज देण्याची शक्यता आहे. या प्रकरणी संबंधिताच्या वेतनातून रक्कम वसुलीची तरतुद आहे.
६. आपण स्वत:च महापालिकेच्या सेवेतून निवृत्त होत आहोत व आपणास वेळेत सेवानिवृत्ती वेतन मिळावे, या भावनेतून सेवानिवृत्त वेतन प्रकरणी पाठपुरावा करावा.
७. याबाबत काही मार्गदर्शन, सहकार्य हवे असल्यास सल्लागार (कामगार) कार्यालय व पुणे मनपा सेवानिवृत्त संघाच्या पदाधिकाऱ्यांशी दर बुधवारी सल्लागार (कामगार) सुविधा केंद्रात ११ ते ५ या कालावधीत संपर्क साधावा.

## गरजेनुरुप व सतत प्रशिक्षण योजनेंतर्गत व्याख्याने

दिनांक १/७/२००८ रोजी सुरु झालेल्या कामगार प्रशिक्षण वर्ग क्र. ७१ व ७२ मध्ये पुढील व्याख्यात्यांनी विविध विषयांवर प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. प्रा.ए.एम.जोशी - कार्यप्रेरणा, श्री. द्विजेन स्मार्त, मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र - व्यसने प्रकार, दुष्परिणाम व उपाय, सौ.अकल्पिता सप्रे - स्वओळखीतून स्वविकास, डॉ.रश्मी हेबाळकर - कार्यक्षमता वृध्दी, श्री. एन.के.गुणे - एकविसाव्या शतकातील आव्हाने, सौ. जया गोफणे - आत्मसम्मान, श्री. चारुदत्त भावे, कमिन्स इंडिया लि. - आपले भविष्य आपल्या हाती, श्री. मधुकर बिबवे - उत्पादकता, डॉ. पी.पी.जोशी, संचालक, केंद्रीय कामगार शिक्षण मंडळ, पुणे - सकारात्मक दृष्टिकोन, श्री. एस.बी.रामटेके, शिक्षणाधिकारी, केंद्रीय कामगार शिक्षण मंडळ, पुणे - कार्यसंस्कृती, श्री. जगदाळे एम.एम., सरचिटणीस, सॅण्डविक एशिया एम्प्लॉईज युनियन - कामगार चळवळीची बदलती दिशा, श्री. चंद्रकांत शितोळे - मनपा सेवा विनियम, सौ. अर्चनाताई कुलकर्णी - कार्य हीच देवपूजा, श्री. मकरंद टिल्लू - हास्ययोगातून तणाव मुक्ती, श्री.अनिल वेल्हाळ व इतर अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते - अंशश्रध्दा, श्री. प्रफुल्ल जाधव, शाखा व्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र, धनकवडी - बचतीचे महत्व व बँकेचे व्यवहार, श्री. लीलाधर वाबळे - संगणकाचे महत्व. अशी १७ व्याख्याने दिनांक २५/७/२००८ अखेर झाली. उर्वरित कालावधीमध्ये नामांकित तज्ञांची व्याख्याने आयोजित करण्यात येणार आहेत.

## गरजेनुरुप प्रशिक्षण

राज्य नागरी विकास संस्था, यशदा, पुणे या संस्थेने पुणे मनपाच्या प्रशासकीय सेवेत काम करणाऱ्या अधिकारी सेवकांना गरजेनुरुप प्रशिक्षण देणेकामी प्रशिक्षणाच्या गरजांचे विश्लेषण करण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने दि.१६/७/०८ रोजी मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि) यांचे कार्यालयात मा.राजेंद्र निंबाळकर, उप संचालक, राज्य नागरी विकास संस्था आणि मा. आरती पारखी, प्रकल्प समन्वयक यांचेसमवेत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यावेळी मा. सल्लागार (कामगार), मा. मुख्य लेखापाल आणि अन्य अधिकारी उपस्थित होते. यशदाच्या प्रस्तावावर उभय पक्षांमध्ये सखोल चर्चा करण्यात आली आणि चर्चेअंति प्रथमत: पुणे मनपातील अधिकारी सेवकांना प्रशिक्षण देणे आहे. तथापि, असे प्रशिक्षण देण्यापूर्वी प्रत्येक खात्याच्या गरजा विचारात घेवून प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. त्यासाठी मूलत: संबंधित खातेप्रमुख, अधिकारी आणि सेवक यांचेकडून त्यांच्या खात्यास कोणत्या प्रकारचे प्रशिक्षणाची आवश्यकता आहे, हे जाणून घेणे नितांत गरजेचे आहे. त्या अनुषंगाने मुलभूत सर्वेक्षण करावे लागणार आहे. प्रशिक्षणाच्या गरजा निश्चित केल्यानंतर प्रत्यक्ष प्रशिक्षण कार्यक्रम वा शिबिरे आयोजित करणे संयुक्तिक आणि उपयुक्त होणार आहे. यावर उभय पक्षांमध्ये एकमत झाले. चर्चेअंति मनपाकडील खात्याची आणि सेवकांची संरचना,प्रत्येक खातेनिहाय सेवक वर्गवारी व संख्या या बाबींची माहिती मिळाल्यास यशदाला आपला अंतिम परिपूर्ण प्रस्ताव मनपाकडे सादर करणे शक्य होणार आहे, असे प्रतिपादन मा.उप संचालक, यशदा यांनी केले. मा.उप संचालक, यशदा यांच्या मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती त्यांना देण्यात आली आहे. त्या माहितीच्या आधारे अंतिम प्रस्ताव यशदाकडून येणार आहे. तो आल्यानंतर त्यावर निर्णय घेवून प्रशिक्षणाच्या मुलभूत गरजांचे विश्लेषण करुन अंतिमत: त्या निश्चित करणेकामी सर्व्हेक्षणाचे काम सुरु होणार आहे. त्या सर्व्हेक्षणाच्या कामामध्ये सर्व मा. खातेप्रमुख, मा. अधिकारी आणि सेवक यांनी यशदाच्या अधिकाऱ्यांना आवश्यक ते सहकार्य करुन माहती व कागदपत्रे उपलब्ध करुन दिल्यास सदर काम विहित वेळेत आणि सुलभपणे होणार आहे. हे सहकार्य सर्व मा. खातेप्रमुख व अधिकारी सेवकांकडून निश्चित केले जाईल, अशी प्रशासनाची धारणा आहे.

## वाचकांसाठी...

- खातेप्रमुखांच्या कार्यालयाकडून दरमहा अंक उपलब्ध करुन कार्यालयाच्या दर्शनी भागावर/सूचना फलकावर लावा.
- आपला अंक वाचून झाल्यावर दुसऱ्याला वाचण्यास द्या.
- अभिप्राय व सूचना द्या.
- नवीन स्तुत्य उपक्रम/योजना/कार्यक्रम यांचे फोटोसहित संक्षिप्त वृत्त पाठवा.
- मनपा वेबसाईटवर प्रसिध्द केलेला अंक पहा.
- अंकासाठी लेख, कविता, विनोद, इत्यादी साहित्य छायाचित्रासह पाठवा.

**कल्याणवार्ता**
**जुलै, २००८**
**प्रकाशक तथा अध्यक्ष**
**कामगार कल्याण निधी**
**मा. प्रविणसिंह परदेशी**
आयुक्त, पुणे महापालिका
**संपादक**
मा. नंदकिशोर जगताप
सल्लागार (कामगार)
**कार्यकारी संपादक**
श्री.शिवाजी दौंडकर
कामगार कल्याण अधिकारी
**सहाय्यक**
सौ. ज्योती अ.भोसले
**मुद्रक**
श्री. जयंत पवार
व्यवस्थापक,
मुद्रणमहर्षि मामाराव दाते मुद्रणालय, मनपा, पुणे.
**प्रकाशन स्थळ**
पुणे महापालिका
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.
**संपर्क**
सल्लागार (कामगार) कार्यालय, पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५५/१२५२/१२५३
ईमेल आयडी
nandkumar.jagtap@punecorporation.org
**फक्त खाजगी वितरणासाठी**
(विनामूल्य)